## <u>प्रेस नोट</u> दिनांक - 10/09/2026

# पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ - 02 मुंबई
# पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई

### विदेशात नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश, तीन वेगवेगळया राज्यांतून आरोपींना अटक केलेबाबत

---

मस्जिद बंदर (पश्चिम) येथील 'अल शिफा ट्रॅव्हल्स' या कार्यालयातून विदेशात नोकरी लावण्याच्या बहाण्याने नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीवर पायधुनी पोलिस ठाण्याच्या पथकाने कारवाई केली आहे. सदर गुन्हयातील आरोपींनी फिर्यादी तसेच इतर इच्छुक उमेद्वारांना परदेशात नोकरीचे आमिष दाखवून त्यांचे मूळ पासपोर्ट, बायोडाटा आणि प्रत्येकी रु. १५,०००/- ची रक्कम घेऊन त्यानंतर कोणतीही नोकरी न देता त्यांची फसवणूक केली व त्यानंतर नमूद कार्यालय तसेच त्यांचे वापरते मोबाईल बंद करून आरोपी पसार झाले होते. सबब फिर्यादी यांचे तक्रारीवरून पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र. 886/2026 कलम 318(4), 336(2), 336(3), 340(2),3(5) भारतीय न्याय संहिता 2023 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

पायधुनी पोलीस पथकाने नमुद गुन्हयातील आरोपी १) तबरेज आलम अन्सारी यास हरियाणा राज्यातून २) मोहम्मद शमीम अन्सारी यास मधुबनी, बिहार राज्यातून तर ३) व्यंकटेश गंगय्या चकल यास जे. जे. डॉरमेट्री, टेमकर स्ट्रीट, मुंबई येथून तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अटक केली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या ताब्यातून खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

| क्र. | मुद्देमालाचा तपशिल | एकूण संख्या |
|---|---|---|
| 1. | भारतीय पासपोर्ट | 50 |
| 2 | संगणक/ लॅपटॉप | 06 |
| 3 | मोबाईल हॅडसेट | 09 |
| 4 | बँक चेकबुक्स/ डेबिट कार्ड/आधार कार्ड, पॅनकार्ड, वोटींग कार्ड | 13 |
| 5 | बनावट नेमणूक पत्रे | 02 |

अद्यापावेतो केलेल्या तपासात एकुण 10 व्यक्तींची फसवणुक झाल्याचे निष्पन्न असून, फसवणुक झालेल्या व्यक्तींची संख्या 50 पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. तरी अशा प्रकारे कोणत्याही नागरिकांची फसवणुक झाली असल्यास त्यांनी तात्काळ पायधुनी पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा.

सदरची गुन्हयाची उत्कृष्ट कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त, श्री देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त श्री.मनोजकुमार शर्मा ( कायदा व सुव्यवस्था ), मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री शैलेश बलकवडे (दक्षिण प्रादेशिक विभाग ), मा.पोलीस उप आयुक्त श्रीमती रागसुधा आर.(दक्षिण परिमंडळ 02), सहाय्यक पोलीस आयुक्त पायधुनी विभाग श्रीमती रेणूका बूवा यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक लक्ष्मीकांत साळुंखे यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. अजय कदम, तपासी अधिकारी पोउनि. गोंविद फड, स.पो.नि. रज्जाक शेख, पो. हवा. 080931/घोडे, पो. ह. क्र. 010393/पवार, पो.शि.क्र.130288/ इतापे, पो. शि.क्र.140153/पाटील, पो. शि. क्र. 093480/तुंडीवाले, पो.शि.112903/ कुबेर काळेल, पो.शि.क्र. 140153/पाटील, पो. शि.क्र.180001/कदम, पो.शि.क्र.151562 /जगदेव यांनी केली आहे.